# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका
## यांचे कार्यालय

नवरे आर्केड, सत्यम टॉवर, २ रा मजला, शिव मंदिर रोड, अंबरनाथ (पूर्व) ता. अंबरनाथ, जिल्हा-ठाणे

जा.क्र. सनि/अंबरनाथ/बी-२/अंबरनाथ सामु शेतकी/का. क. ८८/३०८/सन २०१७
दिनांक :- १०/११/२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका, Assistant Registrar, C.S. Ambernath, Dist Thane, जि. ठाणे

वाचावे :- १) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये काढलेला आदेश क्र. सनि/अंबरनाथ/बी-२/अंबरनाथ सामु.शेतकी/का.क.८३/६९०/सन २०१५, दिनांक ०४/०७/२०१५

२) श्री. बाळ परब, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शहापूर तथा चौकशी अधिकारी यांनी कलम ८३ अन्वये दि. १०/०२/२०१६ रोजी दाखल केलेला चौकशी अहवाल.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम १९६१ मधील नियम ७२ मधील तरतूदी.

---

ज्याअर्थी, अंबरनाथ सहकारी सामुदायिक शेतकी सोसायटी लि., (यापुढे यानावाने वाचावे) शिवमंदिर रोड, गोविंद तीर्थ पुलाजवळ, अंबरनाथ (पूर्व), ता. अंबरनाथ, जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे) व नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे) मधील तरतुदीनुसार पंजीकृत करण्यात आलेली संस्था असून तीचा नोंदणी क्रमांक टीएनए/एफजी-५१/सन १९६२, दि. ०१/०६/१९६२ असा आहे व ती या कार्यालयाचे कार्यकक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, सदरची संस्था सहकारी कायद्यान्वये नोंदणीकृत झालेली असल्यामुळे सदर संस्थेस सहकारी कायद्यानुसार व संस्थेच्या पोटनियमानुसार कामकाज करणे बंधनकारक आहे. आणि.,

ज्याअर्थी, अंबरनाथ सहकारी सामुदायिक शेतकी सोसायटी लि., शिव मंदिर रोड, गोविंद तिर्थ पुलाजवळ, अंबरनाथ (पूर्व), ता. अंबरनाथ, जिल्हा-ठाणे या संस्थेने या कार्यालयाकडे दिनांक २५/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये संस्थेचे सभासद तथा माजी पदाधिकारी श्री. गुलाबराव करंजुले व तत्कालीन व्यवस्थापन समिती यांनी संस्थेच्या जमीनीवर केलेल्या नियमबाहय कामकाजाची ७ मुद्दाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला होता. त्यानुसार सदर संस्थेची वस्तुस्थितीदर्शक चौकशी करण्यासाठी या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून श्री. बाळ परब, तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शहापूर यांची दि. ०४/०७/२०१५ चे आदेशान्वये नियुक्ती केलेली होती. आणि,

ज्याअर्थी, श्री. बाळ परब, चौकशी अधिकारी यांनी दि. ०५/०२/२०१६ रोजीचे पत्र व अहवाल दि. १०/०२/२०१६ रोजी या कार्यालयास चौकशी अहवाल सादर केलेला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये नमुद केलेल्या ७ मुद्यांचे अनुषंगाने चौकशी अधिकारी यांनी चौकशी करुन त्यात कलम ८८ चौकशी होणेबाबत नमुद केलेले आहे. आणि.,

ज्याअर्थी, या कार्यालयात श्री. बाळ परब, तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शहापूर यांनी . १०/०२/२०१७ रोजी या कार्यालयात चौकशी अहवाल सादर केला असता सदर अहवालाबाबत श्री. गुलाबराव करंजुले यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोंकण विभाग, सी.डी. डी. बेलापूर येथे कलम ८३ च्या आदेशाविरुध्द अपिल दाखल असुन सद्यस्थितीमध्ये मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची स्थगिती अथवा श या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे सदर अहवालातील मुद्यांचे अनुषंगाने झालेल्या नुकसानाची जबाबदारी त करण्यांकरिता चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे. आणि.,

जिल्हा उपनिबंधक,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, कलम ८३ अन्वये नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडील अहवालात सुचविल्याप्रमाणे संबंधीत मुद्दयावर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत चौकशी अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे. असे माझे मत झाल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारापरत्वे मी, सुधाकर मोहिते, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका, असा आदेश देत आहे की, अंबरनाथ सहकारी सामुदायिक शेतकी सोसायटी लि., शिवमंदिर रोड, गोविंद तीर्थ पुलाजवळ, अंबरनाथ (पूर्व), ता. अंबरनाथ, जि. ठाणे या संस्थेच्या जमीनीवर केलेल्या नियमबाह्य कामकाजाची ७ मुद्यांबाबतच्या आर्थिक गैरव्यवहारासाठी जबाबदारी निश्चित करणेसाठी श्री. बी .आर. मगदूम, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. त्यांनी सोबत जोडल्या परिशिष्ठ-अ मधील मुद्दयावर चौकशी करुन त्यांना चौकशी फी रु. २०,०००/- मंजूर करण्यात येत आहे. तेवढया रक्कमेचा धनादेश संस्थेने मा. जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था, ठाणे यांचे कार्यालयाकडे जमा करावा.

प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम १९६१ चा नियम ७२(२) अन्वये तसेच सहकारी खात्याकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन तसा अहवाल ३ महाच्या आंत या कार्यालयास सादर करावा.

प्रस्तुत आदेश आज दि. १०/११/२०१७ रोजी माझे सही व शिक्यानिशी देत आहे.

(सुधाकर मोहिते)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका.

दिनांक :- १०/११/२०१७.
ठिकाण :- अंबरनाथ.

Scanned by CamScanner